वाचा - १) या कार्या आदेश क्र.आरोग्य/आस्था-४/३४३/२०१५ दिनांक २०/०४/२०१५
२) मा.राज्यमंत्री,ग्रामविकास यांचेकडिल आदेश क्र.डीईएन २०१७ /प्रक २९/आस्था १२ दि.०३/०६/२०१७
३) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचेकडिल मंजूर टिपणी दिनांक ६ /११/२०१७

# आदेश

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक,
आरोग्य विभाग,
जा.क्र.आरोग्य/आस्था-५/१३४६/२०१७
नाशिक, दिनांक:- ६ / ११ /२०१७

ज्या अर्थी श्रीम.यामिनी बद्रीनाथ भड, आरोग्य सेविका (महिला), प्राथमिक आरोग्य केंद्र. तळेगांवरोही, ता.चांदवड यांना उक्त वाचा क्र.१ अन्वये श्रीम. भड, आरोग्य सेविका, स्थावर मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी नियुक्ती प्राधिकरणाची पुर्व परवानगी न घेता संपादिक केल्याने मुळवेतनावर आणण्याची शिक्षा देण्यात येत आहे. असा आदेश या कार्यालयाकडुन पारीत करण्यात आलेला आहे. श्रीम.भड, आरोग्य सेविका यांनी आदेशात नमुद शिक्षेविरुध्द मा.अप्पर आयुक्त विभाग, नाशिक यांचेकडेस इएमपी अपील नं.१८/२०१५ दाखल केले. सदरचे अपीलावर निर्णया होवुन दि.२२/११/२०१६ च्या मा.अप्पर आयुक्त नाशिक यांचेकडील निर्णयानुसार अपील फेटाळण्यात आले. श्रीम.भड, आरोग्य सेविका यांनी सदरचे दोन्ही आदेशाविरुध्द मा.ना.राज्यमंत्री यांचे कार्यालयास दि.२३/०१/२०१७ रोजी पुर्नरिक्षण अर्ज दाखल केला. सदर प्रकरणांची सुनावणी दिनांक.१८/०४/२०१७ रोजी मंत्रालय मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सुनावणी अंती श्री. भड, आरोग्य सेविका यांचा अर्ज अशंत:मान्य करण्यात आलेला आहे.

ज्या अर्थी वाचा क्र.१ चा आदेश या आदेशान्वये रद्द करणेत आला असुन श्रीम.भड, आरोग्य सेविका (महिला) यांचा सुधारीत आदेश खालील प्रमाणे करणेत येत आहे.

त्या अर्थी श्री.भड, आरोग्य सेविका (महिला) यांची **महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग कलम ४ (२)** त्यांची एक वेतनवाढ एक वर्षासाठी पुढील वेतवाढीवर परिणाम होणार नाही. अशा रितीने रोखुन ठेवणेस या आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करणेत येवुन आदेशाची नोंद श्रीम.भड आरोग्य सेविका यांच्या मुळसेवा पुस्तकात घेणेत यावी.

६/११/१७

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

**प्रत - योग्य त्या कार्यवाहीस्तव व माहीतीस्तव रवाना . . . . .**

१) गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती, सुरगाणा.
२) तालुका वैद्यकिय अधिकारी, पंचायत समिती, सुरगाणा.
३) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र.तळेगांवरोही, ता. चांदवड हल्ली कार्यरत प्रा.आ.केंद्र.उंबरठाण,ता.सुरगाणा
४) मा.मुख्य लेखा वित्त अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक.
५) मध्यवर्ती माहिती तंत्र कक्ष (आयटी सेल) सामान्य प्रशासन विभाग, जि.प.नाशिक.
६) अस्थापना क्लर्क / बील क्लर्क.